# जाहीर सूचना

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

अधीक्षक अभियंता, महावितरण, बारामती ग्रामीण मंडल, ऊर्जा भवन, दुसरा मजला, भिगवण रोड, बारामती, या आस्थापनेवर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (एम.एस.बी.एस.एच.एस.सी.ई.) यांचे १०+२ बंधामधील माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय पाठ्यक्रम पूर्ण केल्यावर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी वीजतंत्री/तारतंत्री अथवा सेंटर ऑफ एक्सलन्स (इलेक्ट्रिकल सेक्टर) व्यवसायासाठी दिलेले राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र अथवा २ (दोन) वर्ष पदविका (वीजतंत्री/तारतंत्री) प्रमाणपत्र प्राप्त उमेदवारांकडून एकूण ९९ जागा भरण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक पात्र उमेदवारांनी दि. २९-१-२०२१ ते दि. ५-०२-२०२१ सायं. ६.०० वाजेपर्यंत www.apprenticeship.gov.in या संकेतस्थळावर पुढील आस्थापनेवर Online नोंदणी करावी.

१. बारामती विभागासाठी आस्थापना क्र. E १०१६२७००२०२.
२. सासवड विभागासाठी आस्थापना क्र. E ०५२०२७०११८३
३. केडगाव विभागासाठी आस्थापना क्र. E १०१६२७००३६१

टीप :

१. दि. ५-२-२०२१ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
२. उमेदवाराने **www.apprenticeship.gov.in** या संकेतस्थळावर बारामती, सासवड व केडगाव विभागाकरिता नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. उमेदवारांनी प्रोफाईल १००% भरलेला असावा व आधार लिंक असणे गरजेचे आहे.
३. जानेवारी २०१८ ते ऑक्टोबर २०२० या कालावधीमध्ये ITI उत्तीर्ण झालेले उमेदवार यांचे अर्ज स्वीकारले जातील.
४. पात्र उमेदवारांची मूळ कागदपत्रांची पडताळणी दि. १५-२-२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता बारामती ग्रामीण मंडल कार्यालय, भिगवण रोड, बारामती येथे करण्यात येईल. त्याचप्रमाणे सोबत सर्व मूळ कागदपत्रे व त्यांची साक्षांकित छायांकित प्रत आणावी.
५. कागदपत्र छाननी/ पडताळणीकरिता उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.
६. निवड झालेल्या उमेदवारास नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा केले जाईल तसेच प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा राहील.
७. शिकाऊ उमेदवार निवड प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांना राहतील.

**अधीक्षक अभियंता**
महावितरण, बारामती ग्रामीण मंडल

**PRO/BMTZ/** १६२/२०२०-२१